- 5 SEP 2023 लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी डॉ. विलास शिंदे

**लोकसत्ता प्रतिनिधी**



शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी नियुक्तीचे पत्र प्रदान केले.

**कोल्हापूरः** शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. विलास नेताजी शिंदे यांची मंगळवारी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी निवड करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे ते ११ वे कुलसचिव आहेत. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी नियुक्तीचे पत्र प्रदान केले.

डॉ. शिंदे यांनी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिवपद भूषविले आहे. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव म्हणूनही त्यांनी प्रशासकीय कामकाजाचा ठसा उमटविलेला आहे. क्रायोजेनिक्स विषयातील विकासात्मक संशोधनासाठी प्रा. एम.सी. जोशी पुरस्काराचे ते सहमानकरी आहेत.

**पर्यावरण अभ्यासक, लेखक**

वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन हे त्यांचे जिव्हाळ्याचे विषय असून भारतीय शास्त्रज्ञ, हिरव्या बोटांचे किमयागार, आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया आणि एककांचे इतर मानकरी ही त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाचा विज्ञान साहित्यासाठीचा 'महात्मा जोतीराव फुले पुरस्कार'सह अनेक मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**लौकिक उंचावणार**

शिवाजी विद्यापीठचा लौकिक उंचावण्यासाठीच मी आजवर काम करीत आलो आहे. कुलसचिव पदाची जबाबदारी ही माझ्या दृष्टीने सर्वोच्च संधी असून येथील सर्व घटकांना सोबत घेऊन या पुढील काळात काम करण्यास प्राधान्य राहील, अशी प्रतिक्रिया डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केली.

5 SEP 2023 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.

# डॉ. शिंदे कुलसचिवपदाचा लौकिक उंचावतील

**■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन**

प्रतिनिधी
कोल्हापूर

मातृसंस्थेप्रती निष्ठा आणि प्रामाणिकपणा या गुणांच्या बळावर डॉ. व्ही. एन. शिंदे विद्यापीठाच्या कुलसचिवपदाचा लौकिक उंचावतील, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

नूतन कुलसचिव डॉ. शिंदे यांचे विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने स्वागत करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत केले. उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे यांनी आभार मानले.

यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले आदी उपस्थित होते.

पुढारी

# पदवी, पदव्युत्तर परीक्षेला २,२२९ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत सोमवारी बॅचलर ऑफ एज्युकेशन, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. परीक्षेला २ हजार २२९ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. भरारी पथकाकडून कोल्हापूर जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.